आदिवासी विकास विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा/अनुदानित आश्रमशाळांसाठी आश्रमशाळा संहिता लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अआशा-२०१७/प्र.क्र.१२७/का-११
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : ८ मार्च, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.व्हीएएस-१०९३/ प्र.क्र.१७०५/९३/का-११, दिनांक १४ सप्टेंबर, २००१.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.अआशा-२००६/ प्र.क्र.७१/का-११, दिनांक १ सप्टेंबर, २००६.
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.याचिका-२०११/ प्र.क्र.३८०/का-११, दि.२८ मार्च, २०१४.

प्रस्तावना :

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीकोनातून त्यांच्या शिक्षणाकरिता निवासी शाळा चालविण्यात येतात. या योजनेंतर्गत आदिवासींच्या आर्थिक दुर्बलतेचा विचार करुन त्यांच्या मुला/मुलींकरिता निवासी आश्रमशाळा आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येतात. सन १९५३-५४ पासून स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जात आहेत. त्यावेळेस आश्रमशाळा योजना ही शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणात सुरु होती. सन १९७५-७६ पासून आश्रमशाळा योजना समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येत होत्या. दिनांक ०१.०५.१९८३ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्र झाला. सद्यस्थितीत आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय निवासी आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित निवासी आश्रमशाळा सुरु आहेत.

२. निवासी आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शासनातर्फे भोजन, निवास, अंथरुण-पांघरुण, वह्या, पुस्तके, गणवेश, लेखन साहित्य व वैद्यकीय सुविधा इत्यादी बाबी मोफत पुरविल्या जातात. शासकीय/अनुदानित आश्रमशाळा चालविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या नियमावलीचा वापर करण्यात येत होता. तथापि, आदिवासी विकास विभाग स्वतंत्र झाल्यानंतर विभागाकडे असलेल्या आश्रमशाळांची संख्या पाहता आदिवासी विकास विभागाची स्वतंत्र संहिता (नियमावली) असण्याची आवश्यकता निर्माण झाली म्हणून शासनाने दिनांक १४ सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून विभागांतर्गत सर्व शासकीय/अनुदानित आश्रमशाळांना स्वतंत्र संहिता लागू करण्यात आली. परंतू सदर संहितेची अंमलबजावणी करीत असताना त्यातील त्रुटीमुळे अडचण येत असल्याने संस्था चालक संघाकडून सुधारित आश्रमशाळा संहिता प्रसिध्द व्हावी याबाबत सूचना प्राप्त झाल्या होत्या. सदर सूचनांचा विचार करुन शासनाने समितीची नियुक्ती केली. सदर समितीने सुधारित

केलेल्या मसुद्यास दिनांक १७.०८.२००६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. तसेच आश्रमशाळा संहितेमध्ये भविष्यात कराव्या लागणाऱ्या दुरुस्त्याचे अधिकार विभागास असतील, असेही मान्य करण्यात आले. त्यानुसार शासन निर्णय दि. १ सप्टेंबर, २००६ अन्वये सदर आश्रमशाळा संहिता प्रसिध्द करण्यात आली.

३. तथापि, बालकांचा शिक्षण हक्क कायदा २००९ हा महाराष्ट्रात लागू करण्यात आला. सदरचा कायदा आश्रमशाळांसाठी लागू असल्याने या अनुषंगाने संहितेमध्ये बदल करणे क्रमप्राप्त होते. त्या अनुसार शासन निर्णय क्र. याचिका/२०११/प्र.क्र.३८०/का-११ दि.२८/०३/२०१४ अनुसार आश्रमशाळा संहितेमध्ये सुधारणा करण्यासाठी अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली. या अभ्यास गटाच्या विविध कार्यशाळा/बैठका घेण्यात आल्या व २००६ च्या आश्रमशाळा संहितेमध्ये सुधारणा करुन अंतिम सुधारित मसुदा शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला. मा.मंत्रीमंडळाने विभागास दिलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर मसुद्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

१. मा.मंत्रीमंडळाने विभागास दिलेल्या अधिकारास अनुसरुन आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांसाठी लागू करावयाच्या सुधारित आश्रमशाळा संहितेस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता ही दिनांक १७.०८.२००६ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन देण्यात येत आहे.

२. सदर आश्रमशाळा संहिता दि. १ मार्च, २०१९ पासुन आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासकीय/अनुदानित आश्रमशाळांना लागू राहील.

३. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या कर्मचारी आकृतीबंध/वेतनश्रेणी/मानधन/भत्ते/पदभरती याबाबत स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करण्यात येईल.

४. सदर संहितेमधील तरतूदींच्या स्पष्टतेबाबत सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्याचे अधिकार आदिवासी विकास विभागाला राहतील

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१४१५५५९७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.03.08 14:18:45 +05'30'

(सु. ना. शिंदे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव.

२. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव

३. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
४. मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक
५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.
६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर
७. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
८. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक), जिल्हा परिषद
१०. निवड नस्ती (का.११)